**वटपौर्णिमेनिमित्त आऊसाहेब सेवा प्रतिष्ठानकडून वृक्षारोपण**



पान ३ वर

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

वर्ष -19, अंक-43 | छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 29 जून 2026 | किंमत 2 रुपये, पाने -4

# जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार

**महाराष्ट्राची** संपूर्ण अर्थव्यवस्था आणि संस्कृती ही कृषी क्षेत्राभोवती फिरते. परंतु, गेल्या काही वर्षांत निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलले आहे. कधी अवेळी येणारा पाऊस, कधी तीव्र दुष्काळ, तर कधी गारपीट, अतिवृष्टी आणि महापूर... एकामागून एक येणाऱ्या या नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळिराजा पुरता कोलमडून गेला आहे. कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या या शेतकरी बांधवांला पुन्हा पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाने एक अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ते म्हणजेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'.ही योजना केवळ एक तात्पुरती कर्जमुक्ती नसून, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे.

**महाकर्जमुक्तीची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात**

राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी महाकर्जमुक्ती योजना म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे. या निर्णयामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लाखो शेतकरी कुटुंबांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

**योजनेचे त्रिसूत्र कर्जमुक्ती एकवेळा समजोता आणि प्रोत्साहनपर लाभ**

या योजनेचे स्वरूप केवळ कर्जमुक्ती नाही तर, विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून याची अत्यंत अभ्यासपूर्ण आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे:

**यात २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमुक्ती:** जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे.

**एकवेळ समझोता योजना :** ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट') म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी

आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन: अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

**डिजिटल तंत्रज्ञान आणि पारदर्शकता**

कर्जमुक्तीयोजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये यास राज्य शासनाने

'महाआयटी'च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे. सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

**शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आवाहन:**

**आधार प्रमाणिकर अनिवार्य**

शेकऱ्यांनीयोजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे.पात्र शेकऱ्यांनी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह 'आपले सरकार सेवा केंद्रात' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.आणि एकवेळ समझोता (जढड) योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

तक्रार निवारणासाठी सक्षम यंत्रणा - योजनेच्या पारदर्शकतेवर शासनाने विशेष भर दिला आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तसेच या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समितीसुद्धा नियुक्त करण्यात आली आहे.

**प्रशासकीय समन्वय** - सहकार विभाग, जिल्हाधिकारी, बँका, महाआयटी, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासन या सर्व घटकांमध्ये राज्य शासनाने अचूक समन्वय साधला आहे. विविध स्तरांवर कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिल्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि गतिमान झाली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ च्या माध्यमातून राज्यातील लाखो शेतकरी पुन्हा एकदा 'कर्जमुक्त' होऊन 'कर्जपात्र' होणार आहेत. त्यांना नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू कर्जमुक्तीचा लाभ राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला एक नवी गती, नवी ऊर्जा आणि बळिराजाला सन्मानाने जगण्याचा नवा विश्वास देणारा ठरणार आहे.

- काशीबाई थोरात-धायगुडे
(वरिष्ठ सहायक संचालक)

## टीईटी पेपरफुटी प्रकरणाची शासनाकडून गंभीर दखल; दोषींवर कठोर कारवाई केली जाईल - शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे रविवार, दिनांक २८ जून २०२६ रोजी राज्यभरातील १०२८ केंद्रांवर आयोजित करण्यात आलेली 'शिक्षण पात्रता परीक्षा' (TET) २०२६ पेपरफुटीची घटना घडल्याने पुढे ढकलण्यात आली आहे. या प्रकरणाची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली आहे.

शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले की, भिवंडी येथे काही संशयितांकडे टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका असल्याची गोपनीय माहिती पोलीस प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे भिवंडी पोलिसांनी धाड टाकून संबंधित संशयितांना ताब्यात घेतले. पोलिसांनी जप्त केलेल्या प्रश्नपत्रिकेची महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडून पडताळणी करण्यात आली. यात जप्त करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न हे उद्या होणाऱ्या प्रत्यक्ष परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांशी समान असल्याचे आढळून आले आहे. या गंभीर बाबीची दखल घेऊन भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**विद्यार्थ्यांना नव्याने नोंदणीची आवश्यकता नाही**

विद्यार्थ्यांचे हित आणि परीक्षेची पारदर्शकता जपण्यासाठी २८ जून रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. परीक्षेची नवीन तारीख लवकरच जाहीर केली जाईल, तसेच त्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना नव्याने नोंदणी किंवा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही, असेही मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. मंत्री श्री.भुसे म्हणाले, या संपूर्ण प्रकरणाची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासह शालेय शिक्षण विभागाने गंभीर दखल घेतली असून पोलीस प्रशासनाला सखोल चौकशीचे आदेश दिले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## राज्यातील ८४ हजार आशा स्वयंसेविकांना मिळणार विमा संरक्षण

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्यातील आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या हजारो आशा स्वयंसेविका गटप्रवर्तक आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा देण्याची तयारी केली आहे. २१ हजार रुपयांपेक्षा कमी वेतन असलेल्या या सर्व कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सामाजिक सुरक्षा देण्यासाठी 'राज्य कामगार विमा योजना' लागू करण्यात येणार आहे. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तत्काळ शासनाकडे सादर करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी शुक्रवारी प्रशासनाला दिले. कंत्राटी स्वरूपामुळे नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय लाभांपासून वंचित राहणाऱ्या या घटकाला या निर्णयामुळे हक्काचे आरोग्य कवच लाभणार आहे.

मंत्रालयातील आरोग्यमंत्र्यांच्या समिती कक्षात आयोजित करण्यात आलेल्या उच्चस्तरीय बैठकीत याबाबत निर्णय झाला. राज्यात सध्या सुमारे ८४ हजार आशा स्वयंसेविका कार्यरत असून, शासनाच्या विविध आरोग्य योजना तळागाळातील सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचवण्यात त्यांचे योगदान मोलाचे आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका स्पष्ट करताना आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, 'राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा (१०८ आणि १०२ रुग्णवाहिका) अंतर्गत कार्यरत असलेले कर्मचारी प्रामाणिकपणे सेवा बजावत असतात. मात्र, कंत्राटी नियुक्तीमुळे त्यांना सामाजिक सुरक्षेचे लाभ मिळत नाहीत. त्यांच्यावरील वैद्यकीय खर्चाचा भार कमी करण्यासाठी आणि अपघात, गंभीर आजार किंवा मातृत्वाच्या काळात त्यांना आर्थिक सुरक्षितता प्रदान करण्यासाठी 'ईएसआयसी' योजनेचे संरक्षण देणे आवश्यक आहे.' या बैठकीला आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, राज्य कामगार विमा योजनेचे आयुक्त रमेश चव्हाण, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक व आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त डॉ. सुनील भोकरे, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड आणि राज्य कामगार विमा योजनेचे संचालक सोहम वायाळ उपस्थित होते.

**रेशन दुकानातील कामगारांनाही विमा संरक्षण** - आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांशिवाय समाजातील इतरही अनेक अल्पउत्पन्न घटकांना राज्य कामगार विमा योजनेचा लाभ देण्याबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. यामध्ये नागरी सहकारी पतसंस्थांमधील कर्मचारी, रेशन दुकानांमधील कामगार आणि कर्मचारी संघटना, खासगी शैक्षणिक संस्था व शाळांमधील अल्पउत्पन्न कर्मचारी, स्वयंरोजगार संस्था आणि सार्वजनिक वाचनालयांमधील कर्मचारी आदी घटकांचा समावेश आहे.

## वृद्ध असो की विद्यार्थी; सवलतीसाठी आता १ ऑगस्टपासून एनसीएमसी' बंधनकारक

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्य मार्ग परिवहन (ST) महामंडळाच्या बसमधील सवलतीच्या प्रवासासाठी १ ऑगस्टपासून नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMP) अनिवार्य करण्यात आले आहे, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना सुरुवातीला ही अट लागू होणार असून, पुढील टप्प्यात विद्यार्थी, दिव्यांग, पुरस्कारार्थी यांच्यासह सर्व सवलतधारक प्रवाशांनाही हे कार्ड बंधनकारक केले जाणार आहे.

एसटी महामंडळाकडून सध्या सुमारे ३५ प्रकारच्या प्रवाशांना विविध सवलती दिल्या जातात. मात्र, काही ठिकाणी खोटी ओळखपत्रे आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे सवलतीचा गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांनाच सवलत मिळावी, व्यवहारांमध्ये पारदर्शकता यावी आणि रोखविरहित व्यवस्था सक्षम व्हावी, यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्डची अंमलबजावणी करण्यात आली आहे. महामंडळाच्या माहितीनुसार, राज्यभरात आतापर्यंत ५१ लाखांहून अधिक प्रवाशांची नोंदणी पूर्ण झाली असून, त्यापैकी २५ लाख कार्ड कार्यान्वित केली आहेत. प्रवाशांच्या सोयीसाठी राज्यभरात चार हजारांहून अधिक अधिकृत एजंट नियुक्त करण्यात आले आहेत. निर्धारित शुल्कापेक्षा जास्त दराने कार्ड विक्री करणाऱ्या केंद्राचा परवाना रद्द करण्याचा इशाराही एसटी महामंडळाने दिला आहे.

**कुठे व कसे मिळेल कार्ड ?**

१) बसस्थानकांवरच नोंदणीची सुविधा उपलब्ध, नवीन एनसीएमसी कार्डसाठी १९९ रुपये शुल्क. २) जुने कार्ड परत केल्यास १४९ रुपयांत नवीन कार्ड. ३) कार्डमध्ये किमान १०० रुपये शिल्लक असणे आवश्यक. ४) ५० रुपयांच्या पटीत रिचार्ज करता येणार. ५) ईटीआयएम मशिन, अधिकृत संकेतस्थळ, ॲप किंवा अधिकृत एजंटमार्फत रिचार्जची सुविधा उपलब्ध.

## 'शुद्धते'चा बुरखा आणि पुरुषी मानसिकतेची झापड

डेटॉलच्या लाँड्री सॅनिटायझरच्या जाहिरातीवरून सध्या वादळ उठलेले आहे. पण, ही केवळ एका ब्रँडकडून झालेली चूक नाही, तर हजारो वर्षांपासून स्त्रीकडे पुरुषी झापडं लावून पाहणाऱ्या नजरेतील घाण दाखवणारा हा आरसा आहे.जाहिरातीतला पुरुष १० पेक्षा अधिक स्त्रियांशी संबंध ठेवूनही आपल्या होणाऱ्या पत्नीने मात्र 'व्हर्जिन' असावे, अशी अपेक्षा करतो. जी स्त्री आधी कुणासोबत राहिली असेल ती 'प्रदूषित' आणि जी नाही ती 'स्वच्छ'. ही विभागणीच मुळात स्त्रीला माणूस म्हणून नव्हे, तर 'वापरण्याची वस्तू' म्हणून बघण्याच्या विकृत मानसिकतेचे द्योतक आहे.दुहेरी मापदंडाचा हा खेळ नवा नाही. 'मी स्वतः व्हर्जिन नसेन, पण माझी होणारी पत्नी व्हर्जिनच असावी,' हे वाक्य पुरुषसत्ताक व्यवस्थेचा जाहिरनामाच आहे. पुरुषाचा अनुभव हा 'पराक्रम' ठरतो, त्याचे चारित्र्य कर्तृत्वावर मोजले जाते. पण स्त्रीचे चारित्र्य मात्र तिच्या शरीराशी, 'शुद्धतेशी' बांधले जाते. जाहिरातीत तिची तुलना एखाद्या 'युद्ध करंडका'शी केल्याचे दिसते. करंडक म्हणजे जिंकलेली, न वापरलेली वस्तू. इथे प्रेम, विश्वास, बरोबरी गौण ठरते; महत्त्वाची ठरते ती 'मालकी'. डेटॉलसारखा ब्रँड जेव्हा स्त्रीच्या पूर्वायुष्याला 'प्रदूषण' म्हणतो, तेव्हा तो स्त्री आणि रोगजंतू यांची तुलना करतो. ही तुलना तर हीन आहेच, पण त्याहून धक्कादायक आहे तो तर्क. तो म्हणजे, 'प्रदूषित' करणारा पुरुष आहे, पण दोष मात्र स्त्रीच्या माथी. पुरुष १० जणींशी संबंध ठेवूनही 'अनुभवी' ठरतो, पण त्याच्या संपर्कात आलेली स्त्री 'अपवित्र' ठरते? जणू काही पुरुष हा खुद्द डेटॉल साबणच आहे. तो घाण काढतो, पण स्वतः घाण होत नाही, असा त्यातून अर्थ निघतो. ही मानसिकता काही एका दिवसात जन्माला आलेली नाही. कुटुंबव्यवस्थेत मुलीच्या चारित्र्यावर घराण्याची 'इभ्रत' तोलली जाते. सिनेमात खलनायकाचा स्पर्श झाला तरी नायिका 'भ्रष्ट' ठरते. भाषेतही 'खराब झालेली', 'हात लावलेली' ही विशेषणे फक्त स्त्रीसाठी राखीव आहेत. या साऱ्याचा परिणाम म्हणजे स्त्रीच्या निवडीचे स्वातंत्र्य हिरावले जाते, 'इभ्रती'च्या नावाखाली हिंसा घडते आणि पुरुषही 'मालक' असण्याच्या अहंकारात माणूसपण हरवून बसतो. डेटॉलने माफी मागून जाहिरात मागे घेतली, हे स्वागतार्हच. कंपनीचा हेतू 'लिंगभेदावर प्रहार' करण्याचा होता असे त्यांचे म्हणणे.

पण हेतू चांगला असून चालत नाही, मांडणीही संवेदनशील हवी. जाहिरातीच्या शेवटी मुलगी म्हणते, 'असे विषारी पुरुष जंतूंसारखे असतात'. विषारी विचारांवर घाला घालायचा असेल, तर विषारी भाषाच वापरून कसे चालेल?मुद्दा एकच आहे, खरा डेटॉल कशासाठी हवा? कपड्यांवरच्या डागांसाठी नाही, तर मनात साचलेल्या 'शुद्धतेच्या' या विकृत कल्पनेला साफ करण्यासाठी. स्त्री 'प्रदूषित' नसते; प्रदूषित असते ती पुरुषी नजर जी तिच्याकडे माणूस म्हणून पाहू शकत नाही.जोवर समाज स्त्रीच्या चारित्र्याला 'शुद्ध-अशुद्ध' या तराजूत मोजत राहील, तोवर कोणताही साबण आपल्याला स्वच्छ करू शकणार नाही. कारण खरी घाण ही कपड्यांवर नसते, ती विचारांमध्ये असते. आणि त्या विचारांची साफसफाई करण्याची जबाबदारी केवळ एका कंपनीची किंवा एखाद्या जाहिरातीची नसून आपल्या सर्वांचीच आहे.

## मागासवर्गीय लाभार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या विविध योजनेच्या लाभासाठी प्रस्ताव सादर करावेत

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्हा परिषदेच्या स्व-उत्पन्नातील २० टक्के निधीतून मागासवर्गीय प्रवर्गासाठी विविध कल्याणकारी योजना २०२६-२७ वर्षासाठी राबविण्यात येत आहे. यामध्ये संगणक, लॅपटॉप, झेरॉक्स मशीन, कडबा कुट्टी यंत्र, शिलाई मशीन, दुग्ध व्यवसाय (रु. ४० हजार अर्थसाहाय्य), शेळी पालन (रु. २५ हजार अर्थसाहाय्य), सायकल वाटप, शेतीसाठी पाईप व ठिबक संच, पिठाची गिरणी, वाचनालय, वेल्डिंग मशीन आणि मालवाहू रिक्षा आदी एकूण १६ प्रकारच्या योजनांचा लाभ दिला जाणार आहे.

या योजना १०० टक्के अनुदानावर आधारित असून, पात्र लाभार्थ्यांनी आपले प्रस्ताव दिनांक ३१ जुलै २०२६ पर्यंत संबंधित पंचायत समिती कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. आबासाहेब अरवत यांनी केले आहे.

योजनेच्या लाभासाठी अर्जदार हा मागासवर्गीय (SC, ST, VJ-NT, SBC, नवबौद्ध) प्रवर्गातील असावा. योजनेसाठी तहसिलदारांचे जात प्रमाणपत्र आणि उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक आहे. संगणक योजनेसाठी १२ वी उत्तीर्ण आणि एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.

शिलाई मशीनसाठी संबंधित महिला शिवणकाम करत असल्याचा ग्रामसेवकाचा दाखला आवश्यक आहे. शेतीविषयक योजनांसाठी लाभार्थ्यांकडे स्वतःची शेती असल्याचा पुरावा जोडावा.

विद्युत उपकरणांसाठी ग्रामसेवकाचे विद्युत जोडणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. अधिक माहिती व अर्जाच्या नमुन्यासाठी संबंधित तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# ज्या ज्ञानाने जपानला घडवले : जगाला दिशा देणारी सात जीवनतत्त्वे

दुसऱ्या महायुद्धानंतर जपान अक्षरशः उद्ध्वस्त झाला होता. हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुबॉंब हल्ल्यांमुळे देशाची आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक घडी विस्कटली होती. अनेकांनी जपानचा अस्तच झाला, असे मानले होते. परंतु काही दशकांतच या देशाने जगाला चकित केले. मोटारगाड्या, इलेक्ट्रॉनिक्स, रोबोटिक्स, गुणवत्ता व्यवस्थापन, शिक्षण आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांत जपानने जागतिक नेतृत्व मिळवले. हा चमत्कार केवळ आधुनिक यंत्रसामग्री, प्रचंड भांडवल किंवा नैसर्गिक संसाधनांमुळे घडला नाही. त्यामागे होती एक विचारसंपन्न संस्कृती, शिस्तबद्ध जीवनपद्धती, गुणवत्तेबद्दलची निष्ठा आणि सातत्याने स्वतःला अधिक सक्षम बनवण्याची मानसिकता.

जपानी समाजाने काही मूलभूत जीवनतत्त्वे स्वीकारली आणि ती केवळ पुस्तकांमध्ये न ठेवता आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवली. ही तत्त्वे केवळ उद्योग-व्यवसायासाठी नाहीत, तर व्यक्तिमत्त्व विकास, आरोग्य, शिक्षण, मानसिक संतुलन, कौटुंबिक जीवन आणि राष्ट्रनिर्मितीसाठीही तितकीच महत्त्वाची आहेत. आज जगभरातील अनेक संस्था, उद्योग आणि शिक्षणव्यवस्था या तत्त्वांचा अभ्यास करत आहेत. त्यांपैकी सात तत्त्वे विशेष उल्लेखनीय आहेतकायझेन, इकिगाई, हारा हाची बु, सेईरी आणि सेइतोन, किंत्सुगी, वाबी-साबी आणि पोमोडोरो. या संकल्पना समजून घेतल्या तर जपानच्या यशामागील खरी मानसिकता समजून येते.

**कायझेन : दररोज स्वतःला अधिक चांगले बनवण्याची सवय**

'कायझेन' म्हणजे अविरत सुधारणा. आज कालपेक्षा थोडे अधिक चांगले काम करणे आणि उद्या आजपेक्षा अधिक प्रगती करणे, हा त्याचा गाभा आहे. मोठ्या यशासाठी मोठी झेप घेण्यापेक्षा सातत्याने लहान सुधारणा करत राहणे अधिक प्रभावी ठरते, असा या तत्त्वाचा विश्वास आहे. जपानी उद्योगांमध्ये प्रत्येक कर्मचाऱ्याला सुधारणा सुचवण्याचे स्वातंत्र्य असते. उत्पादनातील छोटी चूक, वेळेचा अपव्यय किंवा अनावश्यक खर्च कमी करण्यासाठी प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे गुणवत्ता सातत्याने वाढत राहते, उत्पादकता सुधारते आणि संस्थेची स्पर्धात्मक क्षमता टिकून राहते.

वैयक्तिक जीवनातही कायझेन तितकेच उपयुक्त आहे. दररोज काही पाने वाचणे, नियमित व्यायाम करणे, नवीन कौशल्य शिकणे, वेळेचे नियोजन करणे, खर्चाचा हिशोब ठेवणे किंवा एखादी वाईट सवय कमी करणे अशा छोट्या कृती भविष्यात मोठे परिणाम घडवतात. स्वतःची तुलना इतरांशी करण्याऐवजी कालच्या स्वतःशी करणे, हीच कायझेनची खरी शिकवण आहे. लहान सुधारणांची साखळीच मोठ्या परिवर्तनाचा पाया बनते.

**इकिगाई : यशापेक्षा अर्थपूर्ण जीवनाचा शोध**

प्रत्येक माणूस जगतो; पण प्रत्येकाला जगण्याचा अर्थ सापडतोच असे नाही. 'इकिगाई' म्हणजे जीवनाचा उद्देश किंवा सकाळी उत्साहाने उठण्यामागचे कारण. ज्या कामात आनंद मिळतो, ज्यात आपण कुशल असतो, ज्याची समाजाला गरज असते आणि ज्यातून उपजीविकाही होऊ शकते, त्या चार घटकांचा संगम म्हणजे इकिगाई.

आज अनेक लोक आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही मानसिकदृष्ट्या अस्वस्थ आहेत. कारण त्यांना काम आहे; पण ध्येय नाही. इकिगाई व्यक्तीला स्वतःची ओळख करून देते. शिक्षकाला विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्यात आनंद मिळू शकतो, डॉक्टरला रुग्णसेवेत समाधान मिळू शकते, शेतकऱ्याला अन्ननिर्मितीत अभिमान वाटू शकतो, तर लेखकाला समाजप्रबोधनात जीवनाचा अर्थ सापडू शकतो. जेव्हा व्यवसाय, आवड, कौशल्य आणि समाजहित यांचा सुंदर संगम घडतो, तेव्हा काम ओझे राहत नाही; ते जीवनाचा उत्सव बनते.

**हारा हाची बु : संयमित आहारातून निरोगी आणि दीर्घ आयुष्य**

जपानमधील ओकिनावा प्रदेश जगातील सर्वाधिक दीर्घायुषी लोकांसाठी ओळखला जातो. त्यामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे 'हारा हाची बु' ही सवय. याचा अर्थ पोट ८० टक्के भरल्यानंतर खाणे थांबवणे. अति खाण्यामुळे शरीरावर अतिरिक्त ताण येतो, तर संयमित आहारामुळे पचन सुधारते, वजन नियंत्रणात राहते आणि अनेक जीवनशैलीजन्य आजारांचा धोका कमी होतो.

हे तत्त्व उपाशी राहण्याचा सल्ला देत नाही; तर शरीराच्या गरजा समजून घेण्याची शिकवण देते. आज फास्ट फूड, तणाव आणि अनियमित जीवनशैलीमुळे लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदयरोग यांसारख्या समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत हारा हाची बु हे केवळ आहाराचे तत्त्व नसून आत्मसंयम, आरोग्य आणि दीर्घायुष्याचा जीवनमंत्र आहे.

**सेईरी आणि सेइतोन : सुव्यवस्था हीच कार्यक्षमतेची गुरुकिल्ली**

स्वच्छता आणि सुव्यवस्था या जपानी संस्कृतीच्या ओळखी आहेत. 'सेईरी' म्हणजे अनावश्यक वस्तू दूर करणे, तर 'सेइतोन' म्हणजे आवश्यक वस्तू योग्य ठिकाणी व्यवस्थित ठेवणे. ही दोन्ही तत्त्वे जपानी कार्यसंस्कृतीचा पाया आहेत.

अव्यवस्थित वातावरणात वेळ वाया जातो, चुका वाढतात आणि मनावर ताण निर्माण होतो. याउलट स्वच्छ, नीटनेटकी आणि नियोजनबद्ध जागा कार्यक्षमता वाढवते. जपानमध्ये शाळेतील विद्यार्थी स्वतः वर्ग स्वच्छ करतात. त्यामुळे स्वच्छता ही केवळ सफाई कर्मचाऱ्यांची जबाबदारी राहत नाही, तर प्रत्येक नागरिकाची सवय बनते. ही संस्कृती पुढे उद्योग, कार्यालये आणि सार्वजनिक जीवनातही दिसून येते.

**किंत्सुगी : जखमांनाही सौंदर्य देणारे तत्त्वज्ञान**

तुटलेली मातीची भांडी सोन्याच्या मिश्रणाने जोडण्याच्या जपानी कलेला 'किंत्सुगी' म्हणतात. भेगा लपवण्याऐवजी त्या अधिक उठावदार केल्या जातात. कारण त्या त्या भांड्याच्या इतिहासाचा भाग असतात. या कलेमागे एक अत्यंत गहन जीवनदृष्टी आहे. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात अपयश, दुःख, चुका आणि संकटे येतात. काहीजण त्यामुळे खचून जातात, तर काहीजण त्यातून अधिक मजबूत होऊन पुढे जातात. किंत्सुगी आपल्याला सांगते की जखमा लपवू नका; त्यांना स्वीकारा. कारण त्या तुमच्या संघर्षाच्या, अनुभवाच्या आणि जिद्दीच्या खुणा आहेत.

आजच्या स्पर्धात्मक जगात अपयशाला अनेकदा कमकुवतपणाचे प्रतीक मानले जाते. परंतु जपानी संस्कृती अपयशालाही शिक्षणाची संधी मानते. तुटलेले भांडे सोन्याने जोडल्यावर ते पूर्वीपेक्षा अधिक मौल्यवान वाटते. त्याचप्रमाणे संकटातून बाहेर पडलेली व्यक्ती अधिक परिपक्व, संवेदनशील आणि सक्षम बनते. त्यामुळे किंत्सुगी हे केवळ कलात्मक कौशल्य नाही, तर जीवनाकडे सकारात्मक नजरेने पाहण्याचे तत्त्वज्ञान आहे.

**वाबी-साबी : अपूर्णतेचा स्वीकार म्हणजेच जीवनाची परिपक्वता**

आजचे जग परिपूर्णतेच्या मागे धावत आहे. सुंदर दिसणे, सर्वोत्तम कामगिरी करणे, इतरांपेक्षा पुढे जाणे आणि प्रत्येक गोष्ट निर्दोष असावी, अशी अपेक्षा समाजात वाढत आहे. अशा परिस्थितीत 'वाबी-साबी' ही जपानी संकल्पना वेगळीच दिशा दाखवते. ती सांगते की जीवन स्वभावतः अपूर्ण आहे आणि त्या अपूर्णतेतच त्याचे खरे सौंदर्य दडलेले आहे.

जुनी वस्तू, काळाच्या ओघात बदललेली इमारत, सुरकुतलेला चेहरा, ऋतूंचे परिवर्तन किंवा निसर्गातील साधेपणाइयांतही एक वेगळे सौंदर्य असते. वाबी-साबी आपल्याला साधेपणा, नम्रता आणि वास्तवाचा स्वीकार शिकवते. परिपूर्णतेचा अट्टहास अनेकदा मानसिक तणाव निर्माण करतो; परंतु अपूर्णतेचा स्वीकार मनाला शांतता देतो. प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक नाते आणि प्रत्येक प्रवास हा अपूर्ण असतो; आणि म्हणूनच तो सुंदर असतो.

**पोमोडोरो : वेळेवर प्रभुत्व मिळवण्याचे प्रभावी तंत्र**

वेळ ही प्रत्येकाला समान प्रमाणात मिळणारी सर्वात मौल्यवान संपत्ती आहे. तिचा योग्य वापर करणारा व्यक्तीच दीर्घकालीन यश मिळवतो. 'पोमोडोरो' पद्धतीनुसार २५ मिनिटे पूर्ण एकाग्रतेने काम करायचे आणि त्यानंतर पाच मिनिटांची विश्रांती घ्यायची. अशी चार चक्रे पूर्ण झाल्यावर थोडी मोठी विश्रांती घेतली जाते.

या पद्धतीमुळे एकाग्रता वाढते, काम पुढे ढकलण्याची सवय कमी होते आणि मानसिक थकवाही कमी होतो. विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, अधिकारी, उद्योजक किंवा लेखकप्रत्येकासाठी ही पद्धत उपयुक्त आहे. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, सामाजिक माध्यमे आणि सतत येणाऱ्या सूचनांमुळे लक्ष विचलित होते. अशा वेळी ठरावीक कालावधीसाठी पूर्ण लक्ष एका कामावर केंद्रित करण्याची ही सवय उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढवते.

**सात तत्त्वांचा समान धागा : शिस्त, सातत्य, संयम आणि सकारात्मकता**

या सातही तत्त्वांचा एकत्रित विचार केला तर त्यामध्ये एक समान धागा स्पष्ट दिसतो. तो म्हणजे शिस्त, सातत्य, आत्मसंयम, साधेपणा, गुणवत्तेची जाणीव आणि सतत शिकण्याची तयारी. जपानने प्रगती केली कारण त्यांनी केवळ आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारले नाही; तर आधुनिक विचार, उत्कृष्ट कार्यसंस्कृती आणि जबाबदार नागरिकत्वही स्वीकारले. राष्ट्रनिर्मितीची सुरुवात व्यक्तीच्या चारित्र्यापासून होते, हा संदेश त्यांनी कृतीतून जगासमोर ठेवला.

**भारतासाठी जपानचा संदेश : बदलाची सुरुवात स्वतःपासून**

भारत आणि जपान हे दोन्ही देश प्राचीन संस्कृतीचे वारसदार आहेत. भारताने जगाला योग, आयुर्वेद, ध्यान, अहिंसा, अध्यात्म आणि 'वसुधैव कुटुंबकम' यांसारखी वैश्विक मूल्ये दिली; तर जपानने शिस्त, गुणवत्ता, वेळेचे व्यवस्थापन, सामूहिक जबाबदारी आणि सातत्यपूर्ण आत्मसुधारणेची जीवनशैली विकसित करून दाखवली. आज भारताकडे जगातील सर्वांत मोठी तरुण शक्ती, प्राचीन ज्ञानपरंपरा, वैज्ञानिक क्षमता आणि अमर्याद संधी आहेत. मात्र या क्षमतेचे रूपांतर राष्ट्रीय सामर्थ्यात करण्यासाठी आपल्या दैनंदिन सवयी बदलण्याची गरज आहे.

जर भारतीय समाजाने कायझेनप्रमाणे सतत सुधारणा करण्याची सवय लावली, इकिगाईप्रमाणे जीवनाचा उद्देश शोधला, हारा हाची बुप्रमाणे संयम स्वीकारला, सेईरी आणि सेइतोनप्रमाणे स्वच्छता व सुव्यवस्था अंगीकारली, किंत्सुगीप्रमाणे अपयशातून उभे राहण्याची जिद्द ठेवली, वाबी-साबीप्रमाणे साधेपणा आणि अपूर्णतेचा स्वीकार केला आणि पोमोडोरोप्रमाणे वेळेचे शिस्तबद्ध नियोजन केले, तर त्याचा परिणाम केवळ वैयक्तिक यशापुरता मर्यादित राहणार नाही; तो कुटुंब, संस्था, उद्योग, प्रशासन आणि अखेरीस संपूर्ण राष्ट्राच्या प्रगतीत दिसून येईल.

भारताने जपानसारखे होण्याची गरज नाही; भारताने भारतच राहिले पाहिजे. परंतु जपानकडून शिकण्याची तयारी मात्र नक्कीच ठेवली पाहिजे. कारण शिकणे म्हणजे अनुकरण नव्हे; तर स्वतःला अधिक सक्षम बनवणे होय. भारताच्या अध्यात्म, मानवी मूल्ये, कुटुंबव्यवस्था आणि लोकशाही यांना जपानी शिस्त, गुणवत्ता, वेळेचे भान आणि कार्यसंस्कृतीची जोड मिळाली, तर विकसित भारताचे स्वप्न अधिक वेगाने साकार होऊ शकते.

**समारोप**

जपानने जगाला दाखवून दिले की विकासाची सुरुवात कारखान्यांत होत नाही; ती माणसाच्या मनात होते. राष्ट्रनिर्मितीची सुरुवात संसदेत नव्हे, तर शाळेत, घरात, कार्यस्थळी आणि प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन वर्तनातून होते. म्हणूनच आज भारताने स्वतःला एकच प्रश्न विचारण्याची वेळ आली आहेआपण बदलाची अपेक्षा इतरांकडून करणार आहोत, की बदलाची सुरुवात स्वतःपासून करणार आहोत?

महान राष्ट्रे मोठ्या भाषणांनी घडत नाहीत; ती महान विचार, चांगल्या सवयी, शिस्तबद्ध कृती आणि सातत्यपूर्ण आत्मसुधारणा यांच्या पायावर उभी राहतात. जपानने हे करून दाखवले आहे. आता भारताने ते आत्मसात करण्याची वेळ आली आहे.

**– डॉ. भारत कऱ्हाड,**
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली,
जिल्हा रत्नागिरी.

# वटपौर्णिमेनिमित्त आऊसाहेब सेवा प्रतिष्ठानकडून वृक्षारोपण

## पर्यावरण संवर्धनाचा संदेश; महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**






वटपौर्णिमेनिमित्त आऊसाहेब सेवा प्रतिष्ठानच्या वतीने साई टेकडी गुरुवारी (दि. २५) येथे वृक्षारोपणासह महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात प्रमुख उपस्थित डॉ. दिव्या पाटील यांनी वटपौर्णिमेचे धार्मिक, सामाजिक आणि पर्यावरणीय महत्त्व स्पष्ट केले.

वडाचे झाड दीर्घायुष्य, स्थैर्य आणि समृद्धीचे प्रतीक असून पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन त्यांनी केले. यानिमित्त उखाणे स्पर्धा, टिकली लावण्याची स्पर्धा, खो-खो आणि कबड्डी अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रमात रंगत आणली. स्पर्धेतील विजेत्यांचा आऊसाहेब सेवा प्रतिष्ठानच्या वतीने सन्मानचिन्ह व बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सोनाली बोरसे, मनीषा खोत, खुशी शर्मा, माया नरोडे, जयश्री फंड, प्रीती काश्ते, संजीवनी थोरात, ज्योती पाटील, सविता ढाके, सुचिता ढाके, रमा कुठे, कविता जठार, सुनीता कोल, सुमित्रा गायकवाड, वनिता भोसले, तन्वी दांडगे आणि प्रिया ई. यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करत उपक्रम यशस्वी केला.

# ताडपिंपळगावचे सागर सोनवणे यांना राज्य शासनाचा सर्वोच्च कृषी पुरस्कार जाहीर

**कन्नड : (अट्टल मत प्रतिनिधी)**



'ध्येय जर प्रामाणिक असेल आणि त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली, तर मातीतूनही सुवर्ण यश पिकवता येते,' हे ताडपिंपळगाव (ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील एका तरुण कृषी पदवीधराने सिद्ध केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा 'कृषी भूषण युवा शेतकरी पुरस्कार' ताडपिंपळगावचे प्रयोगशील शेतकरी आणि सागर राजेंद्र सोनवणे यांना जाहीर झाला आहे.

कृषी क्षेत्रातील जाणकार आणि विविध राष्ट्रीय रेकॉर्डसच्या आकडेवारीनुसार, वयाच्या इतक्या कमी टप्प्यावर हा सर्वोच्च राज्यस्तरीय कृषी पुरस्कार मिळवणारे सागर सोनावणे हे बहुदा भारतातील सर्वात तरुण कृषी पदवीधर शेतकरी ठरले आहेत.

लंडनची (UK) मोठी संधी नाकारली

सागर सोनवणे यांनी आपले 'बी.एस्सी. ॲग्रीकल्चर' (B.Sc. Agriculture) चे उच्च शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमुळे त्यांची युनायटेड किंगडम (UK) मधील एका नामांकित विद्यापीठात एम.एस्सी. (M.S>c.) साठी निवड झाली होती. परदेशात जाऊन लाखो रुपयांचे पॅकेज मिळवण्याची सुवर्णसंधी समोर असतानाही, त्यांनी परदेशी सुखापेक्षा मायभूमीत राहून 'ॲग्रो-फार्मा' आणि शाश्वत शेती क्षेत्रात काहीतरी करून दाखवण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि ती संधी नाकारून पूर्णवेळ शेती क्षेत्रात स्वतःला झोकून दिले.

# प्रगतशील शेतकरी भारत बापूराव जाधव यांना राज्यस्तरीय 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार' जाहीर!

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



कन्नड तालुक्यातील ताडपिंपळगाव येथील प्रगतशील आणि प्रयोगशील शेतकरी श्री. भारत बापूराव जाधव यांना महाराष्ट्र शासनाचा अत्यंत प्रतिष्ठेचा 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार' जाहीर झाला आहे.

राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या वतीने दरवर्षी शेती क्षेत्रात उल्लेखनीय, नावीन्यपूर्ण आणि आदर्श कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या पुरस्कारामुळे ताडपिंपळगावसह संपूर्ण कन्नड तालुका आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**आधुनिक तंत्रज्ञान आणि कष्टाचे फळ**

श्री. भारत जाधव यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अतिशय प्रभावी वापर आपल्या शेतीत केला आहे कमी खर्चात आणि उपलब्ध साधनसामग्रीत जास्तीत जास्त शाश्वत उत्पादन कसे घ्यावे, याचे उत्तम उदाहरण त्यांनी परिसरातील शेतकऱ्यांसमोर ठेवले आहे. शेतातील विविध प्रयोग, जलसंधारणाचे नियोजन आणि सातत्यपूर्ण परिश्रमांमुळेच त्यांच्या नावाची या सर्वोच्च पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

**१ जुलै रोजी मुंबईत होणार सन्मान –** स्मृतीचिन्ह, मानपत्र आणि रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या १ जुलै रोजी (कृषी दिनाचे औचित्य साधून) मुंबई येथे आयोजित एका विशेष दिमाखदार सोहळ्यात माननीय राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते भारत जाधव यांना हा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे.

**परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव –** भारत जाधव यांना हा मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याची बातमी समजताच ताडपिंपळगाव आणि कन्नड परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा मोठा वर्षाव होत आहे. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून सर्व कष्टकरी शेतकऱ्यांचा सन्मान आहे, अशी भावना जाधव यांनी व्यक्त केली आहे.

## स्मृतीशेष नामदेव खरात यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनी

# ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूलच्या ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

## सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला दिले प्रोत्साहन; विद्यार्थ्यांना आगळीवेगळी आदरांजली

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



समाजासाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या स्मृती जतन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांचा आणि सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेणे. याच भावनेतून स्मृतीशेष नामदेव दादा खरात यांच्या तिसऱ्या स्मृतिदिना निमित्त ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, सिडको येथे तब्बल ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांना आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या सामाजिक उपक्रमाचे विविध स्तरातून कौतुक करण्यात आले. दि. २३ जून २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमात स्मृतीशेष नामदेव दादा खरात यांचे चिरंजीव तथा संपादक गणेश खरात व संपूर्ण खरात परिवाराच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, कंपास बॉक्ससह विविध शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लागावा आणि शिक्षणाविषयी त्यांच्यात प्रेरणा निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मृतीशेष नामदेव दादा खरात यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर दोन मिनिटे मौन पाळून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या सामाजिक कार्याचा, साध्या जीवनशैलीचा आणि समाजहितासाठी केलेल्या योगदानाचा उपस्थितांनी गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख केला.

यावेळी भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष लक्ष्मण दादा भुतकर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत, 'शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन असून प्रत्येक विद्यार्थ्याने मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी जिद्दीने प्रयत्न करावेत,' असे आवाहन केले. ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे यांनी अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळते, असे सांगत खरात परिवाराच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमास भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष लक्ष्मण दादा भुतकर, ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे, सचिव संगीता खिल्लारे, मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हर्षल पगारे, सुनील चौधरी, विजय पाटील, साहेबराव शिंदे, वैशाली बागुल, रत्नमाला घोरपडे, सुनीता शेजवळ आणि संजय चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार संपादक गणेश खरात यांनी मानले.

# ज्ञानसंदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मिसारवाडी येथे पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके तसेच खाऊचे वाटप




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवसाचा उत्साहात प्रारंभ झाला. ज्ञानसंदीप शिक्षण संस्था संचलित ज्ञानसंदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मिसारवाडी येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवसानिमित्त विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेतर्फे विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके तसेच खाऊचे वाटप करून नवीन शैक्षणिक वर्षाची आनंददायी सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. प्रकाश सोनवणे यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन शाळेचे मुख्याध्यापक श्री. अभिजित सोनवणे यांनी केले. शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती वैशाली बोरुडे, श्रीमती हर्षला खिल्लारे, श्री किरणकुमार सोनवणे, श्री आनंद सातदिवे, श्री स्वामी जाधव, श्री विजय आघाव, श्री गौतम मकासरे, श्री नय्यूम शेख तसेच श्री ताहेर पठाण (तासिका शिक्षक) यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती हर्षला खिल्लारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# महापालिकेची धडक कर वसुली मोहीम; एका दिवसात १५ मालमत्ता सील, १.०९ कोटींची वसुली



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महापालिकेच्या कर वसुली मोहिमेला नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून सलग दुसऱ्या आठवड्यातही एका दिवसात विक्रमी कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार गुरुवारी (दि. २५) शहरातील सर्व १० झोनमध्ये विशेष कर वसुली मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत तब्बल १५ थकबाकीदार मालमत्ता सील करण्यात आल्या, तर १ कोटी ९ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात आला. आयुक्तांच्या सूचनेनुसार अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे आणि उपआयुक्त विकास नवाळे यांनी प्रत्येक झोनसाठी १५ ते २० मोठ्या थकबाकीदारांची यादी तयार करून संबंधित कर वसुली पथकांना कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार दिवसभर शहरभर धडक मोहीम राबवून थकबाकीदारांवर कारवाई करण्यात आली.

**झोननिहाय कर वसुली व सील कारवाई**


- झोन १: रू २.३८ लाख कर वसुल.
- झोन २: २ मालमत्ता सील, रू १८.६१ लाख कर वसुल.
- झोन ३: रू ६.६३ लाख कर वसुल.
- झोन ४: ५ मालमत्ता सील, रू ८.६१ लाख कर वसुल.
- झोन ५: रू ६.६३ लाख कर वसुल.
- झोन ६: १ मालमत्ता सील, रू ७.२१ लाख कर वसुल.
- झोन ७: २ मालमत्ता सील, रू ९.४३ लाख कर वसुल.
- झोन ८: १ मालमत्ता सील, रू ७.०६ लाख कर वसुल.
- झोन ९: २ मालमत्ता सील, रू २८.८० लाख कर वसुल.
- झोन १०: २ मालमत्ता सील, रू ९.२१ लाख कर वसुल.

या मोहिमेत एकूण १५ मालमत्ता सील करण्यात आल्या असून रू १.०९ कोटींचा कर वसूल करण्यात आला आहे. थकबाकीदारांनी स्वयंस्फूर्तीने मालमत्ता कर भरावा, अन्यथा पुढील काळात अशाच प्रकारची कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे.

### पँथर्स रिपब्लिकन पक्षातर्फे राजश्री छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन;

# छत्रपती शाहू महाराजांच्या पुतळ्याची उंची वाढवून चौकाला शाहू महाराजांचे नाव द्या!

## राष्ट्रीय अध्यक्षा सूर्यकांता गंगाधर गाडे यांची मागणी





**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

आरक्षणाचे जनक राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त पँथर्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने मिल कॉर्नर येथील शाहू महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सूर्यकांता गंगाधर गाडे व प्रदेशाध्यक्ष डॉ. सिद्धांत गाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी कार्यकर्त्यांनी जयघोष करत शाहू महाराजांना अभिवादन केले. तसेच परिसरात बुंदी व पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना सूर्यकांता गंगाधर गाडे यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुतळा परिसराचे सुशोभीकरण करावे, पुतळ्याची उंची वाढवावी आणि मिल कॉर्नर चौकाचे नामकरण 'छत्रपती शाहू महाराज चौक' असे करण्यात यावे, अशी मागणी केली. या संदर्भात दरवर्षी शासनाकडे निवेदन दिले जात असले तरी अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. शाहू महाराज हे आरक्षणाचे जनक असून त्यांच्या कार्याला साजेसा सन्मान मिळणे आवश्यक असल्याचे त्या म्हणाल्या.

प्रदेशाध्यक्ष डॉ. सिद्धांत गाडे यांनी आपल्या भाषणात अनुसूचित जाती संवर्गातील आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होत असून अशा उपवर्गीकरणाला पक्षाचा ठाम विरोध असल्याचे स्पष्ट केले. समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्या कोणत्याही धोरणाला विरोध कायम राहील, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात भावना गाडे, प्रदेश प्रवक्ते विलास कटारे, मराठवाडा अध्यक्ष सर्जेराव मनोरे, मराठवाडा संघटक साहेबराव नवतुरे, शहराध्यक्ष तथा पँथर पॉवर कामगार संघटनेचे सहसचिव प्रवीण गाडेकर, राकेश साबळे, अमोल नरवडे, शीलाताई मनोरे, शीलाताई मोरे, शिरीष जाधव, नितीन गांगुर्डे, महेंद्र झीने, राजेंद्र फसाटे, गोपाल पाटील, ज्ञानेश्वर जाधव, सिद्धार्थ पैठणे, सुनील खंडारे, भगवान बोंबले, योसेफ गाडेकर, शंकर लगडे, मुक्तार भाई, मंगेश गाडेकर, सचिन पवार यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे शिक्षकवृंद, पँथर पॉवर कामगार संघटनेचे पदाधिकारी, पक्षाचे कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पडेगाव फायरिंग रेंज परिसरात गोळीबार सराव: नागरिकांनी खबरदारी घेण्याचे पोलीस प्रशासनाचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

ग्रामीण पोलीस आस्थापनेवरील अधिकारी यांचा गोळीबार सराव बुधवार दि.२५जून २०२६ते १८ नोव्हेंबर २०२६ या दरम्यान पडेगांव फायरबट येथे होणार आहे. या कालावधीत पडेगांव फायरींग बट हद्दीतील नागरिकांनी सतर्क रहावे,असे आवाहन राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) यांनी केले आहे.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे - वैराळ मनेश

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन (रजिस्टर क्र. एनजीपी-४५११) यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लाडगाव येथे भव्य राज्यस्तरीय



अधिवेशन उत्साहात पार पडले. राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो ग्रामपंचायत कर्मचारी बंधू-भगिनी या अधिवेशनात सहभागी झाले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांना न्याय मिळावा, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सन्मानाचे जीवन मिळावे आणि त्यांच्या सेवेला योग्य मोबदला मिळावा, असे अहिल्यानगर जिल्हा संघटक तथा अहिल्यानगर तालुकाध्यक्ष वैराळ मनेश यांनी सांगितले. या प्रमुख उद्देशाने छत्रपती संभाजीनगरात अधिवेशन आयोजित करण्यात आले होते.



या अधिवेशनामध्ये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. नगरपालिकेतील कर्मचारी ज्या प्रकारचे काम करतात, त्याच स्वरूपाची जबाबदारी ग्रामपंचायत कर्मचारीही अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. मात्र वेतन, सेवा अटी, भत्ते, सामाजिक सुरक्षा आणि इतर सुविधांमध्ये मोठी तफावत असल्याने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनाही नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी व सर्व शासकीय लाभ लागू करावेत, अशी प्रमुख मागणी अधिवेशनात करण्यात आली आहे.

हे अधिवेशन महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनचे राज्याध्यक्ष तथा आमदार श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चूभाऊ कडू यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आले होते. राज्यभरातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटना सातत्याने संघर्ष करत असून, त्यांच्या प्रलंबित मागण्या शासनाकडून मंजूर करून घेण्यासाठी लढा अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला आहे.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर वाढत चाललेला कामाचा ताण, अपुरे वेतन, कायमस्वरूपी सेवा संरक्षणाचा अभाव, निवृत्तीवेतन, आरोग्य सुविधा तसेच इतर आर्थिक प्रश्न याकडे शासनाचे लक्ष वेधले. ग्रामपंचायत कर्मचारी हे ग्रामीण प्रशासनाचा महत्त्वाचा कणा असून, गावपातळीवरील विविध शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी ते पार पाडतात. त्यामुळे त्यांच्या समस्या तातडीने सोडविणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

अहिल्यानगर जिल्हा संघटक तथा अहिल्यानगर तालुकाध्यक्ष वैराळ मनेश यांनी सांगितले की, 'ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासूनच्या प्रलंबित मागण्या आता शासनाने तातडीने मान्य कराव्यात.

कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करून त्यांना सन्मानजनक वेतन, सेवा संरक्षण आणि सर्व शासकीय सुविधा मिळाल्याशिवाय संघटना स्वस्थ बसणार नाही. आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेला हा लढा निश्चितच यशस्वी होईल आणि महाराष्ट्रातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे चांगले दिवस लवकरच येतील. अधिवेशनात राज्यभरातील हजारो कर्मचारी, पदाधिकारी व प्रतिनिधींनी एकजूट दाखवत आपल्या हक्कांसाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्या शासनाने तातडीने मान्य करून त्यांना न्याय द्यावा, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन उभारण्याचा इशाराही यावेळी संघटनेच्या वतीने देण्यात आला.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199